MHGA130002072023

सत्र खटला क्र.८९/२०२३
(जुना क्र.७५/२०२१)
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
अहेरी–वि–ललिता सिडाम+४

निशानी ६२ वरील आदेश
(दि.०८/११/२०२३)

१. अर्जदार/आरोपी क्र.१ ललिता जगन्नाथ सिडाम हिने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे अहेरी पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २४९/२०२१ मध्ये भा.दं.वि. कलम ३०२, १४७, १४८, १४९, १२०(ब) अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार ही राह. नागेपल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, या प्रकरणात सन २०२२ मध्ये दोष / चार्ज नोंदविण्यात आला परंतु आजपावेतो अभियोग पक्षाने फक्त तीन साक्षीदार तपासले आहेत. त्यामुळे प्रकरणात प्रगती होत नसल्याने अर्जदार ही विनाकारण गजाआड आहे. तसेच या गुन्हयातील आरोपी क्र.२ रोहीणी हिला न्यायालयाने दि.११.१०.२०२३ रोजी जामीन मंजुर केलेली आहे. त्यामुळे समान न्यायतत्वाचे आधारे आरोपीला जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे.

३. तपासणी अधिकारी यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.६३ नुसार दिले की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असुन यातील अर्जदार आरोपी हि तीचे मुलीसोबत संगनमत करून कट रचुन स्वत:चेच पतीला मारण्याकरीता ६ लाख रुपयास यातील आरोपी क्र. ३ ते ५ यांना सुपारी देवुन त्यांचेकडुन स्वत:चे पतीस जिवानिशी ठार मारले आहे. यावरुन अर्जदार आरोपी ही अतिशय क्रूर स्वभावाची आहे. सदर अर्जदार आरोपीस

जामीनावर सोडल्यास ती साक्ष पुराव्यात हस्तक्षेप करुन साक्षीदारांचे मन परिवर्तन करून मा. हुजूर कोर्टात साक्ष देण्यापासुन परावृत्त करेल. अर्जदार आरोपीविरुध्द तीचेच मुलाने सीआरपीसी कलम १६४ अन्वये बयाण दिलेले असल्याने सदर अर्जदार आरोपीचा जामीन झाल्यास ती तीचे मुलास धाक दपटशाही करण्याची तसेच त्याचेसुध्दा जिवीतास धोका निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपीने गुन्हयात वापरलेले मोबाईल भा.पु. का. कलम २७ अन्वये जप्त करण्यात आले आहे. त्यामुळे सदर गुन्हयातील सदर आरोपीचा सहभाग निष्पन्न झाला आहे. सदर अर्जदार आरोपीस जामीनावर सोडल्यास ती मा. हुजूर कोर्टात हजर राहील याची शास्वती वाटत नाही. वरील कारणांमुळे आरोपीचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात आली.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादी जगन्नाथ मडावी पोलिस हवालदार यांनी अशी तक्रार नोंदविली की, दि. ०५.०७.२०२१ चे रात्री ००.३० वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी कारणावरुन जगन्नाथ सिडाम यास जीवानिशी ठार मारले. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, मृतक जगन्नाथ सिडाम हयाचे त्याची पत्नी ललीता व मुलगी रोहिणी यांचे सोबत पटत नव्हते. त्याकरिता त्या दोघांनी आरोपी क्र. ३ इंद्रजीत खोब्रागडे यास सहा लाख रुपये देण्याचे ठरवून आरोपी क्र. ३ ने आरोपी क्र. ४ व ५ च्या मदतीने चाकू व काठयाने मृतकाचा खून केला. घटनेच्या वेळेस मृतकाच्या मुलगा राहूल हा हॉटेलमध्ये जेवणाकरिता गेला होता. तो घरी परत आल्यावर त्याने पोलिसांना फोन करुन बोलावून घेतले.

५. अर्जदार/आरोपी क्र.१ तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, अर्जदाराकडून काहीही जप्त करण्यात आलेले नाही. घटना घडली तेव्हा ती घरात होती. तिने स्वत: आपल्या पतीला चंद्रपुर येथील दवाखान्यात नेले. साक्षीदार राहूल हा मुलगा असून त्याला घटनेबददल काहीही माहिती नसताना त्याच्या आईने त्याच्या वडिलाचा खुन केला असे खोटी माहिती पोलीसांनी त्यास दिले. आरोपी रोहीणी हिला जामीन मंजुर झाल्याने आरोपी हिला समान न्यायतत्वाचे आधारे जामीन मंजुर करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

६. याउलट सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, आरोपी क्र.२ व अर्जदार यांच्या गुन्हयातील सहभाग वेगवेगळा असल्यामुळे समान न्यायतत्वाचे आधारे अर्जदार हिला जामीन मागता येणार नाही. अर्जदार हिचा मुलगा राहुल याने स्वत: न्यायालयाकडे जबाब देताना असे सांगितले की, अर्जदार हिने स्वत: तिच्या पतीला मारण्याकरीता सुपारी दिलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिचा गुन्हयाशी थेट संबंध असल्याने व राहुल याची साक्ष नोंदविणे बाकी असल्याने अर्जदार हिचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

७. या गुन्हयातील आरोपी क्र.२ रोहणी हिच्याविरूध्द असा आरोप होता की, तिने आरोपी क्र.३ ते ४ यांच्याशी संपर्क ठेवला होता आणि तो संपर्क ज्या भ्रमणध्वनी द्वारे केला होता तो भ्रमणध्वनी तिचेकडून जप्त करण्यात आलेला आहे. पंरतु अर्जदार हिचेविरूध्द असे आरोपी ठेवण्यात आले आहे की, तिने आरोपी क्र.३ ते ५ यांना पैसे देवून स्वत:च्या पतीला मारले आणि ती बाब स्वत: आरोपीने राहुलला सांगितली. अशा परिस्थितीत राहुल याची साक्ष फार महत्वाची ठरते. या प्रकरणात राहुलची साक्ष नोंदविणे बाकी आहे. त्यामुळे अर्जदार हिला समान न्यायतत्वाचे आधारे जामीन मागता येणार नाही. तसेच अर्जदार हिला जामीन दिल्यास ती स्वत:चा मुलगा राहुल याचेवर दबाव आणू शकते अथवा अर्जदार हिच्यापासून त्याचा सुध्दा जिवीताला बरेवाईट होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. करीता अर्जदार हिला राहुलची साक्ष नोंदविण्यापुर्वी जामीन देणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

जामीन अर्ज निशानी ६२ नामंजुर करण्यात येतो.

स्वा/—
(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.

अहेरी
दि.०८.११.२०२३